पी.डब्ल्यु.डी.व्ही.ए. क्रं. ७८/२०१६ मधील नि. ३० खालील आदेश.

प्रस्तुत प्रकरणातील वि.प.क्रं. १ ते ३ यांनी अर्जदाराने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियमाअन्वये दाखल केलेल्या अर्जातील कथने नाकारुन नि. ३० वर अर्ज दाखल करुन अर्जदार यांनी प्रस्तुत प्रकरणात ज्या दादी मागितल्या आहेत त्या अवास्तव असून अर्जदार हे आजतागायत मलकापूर येथील वि.प. यांच्या घरी एकत्रात राहण्यास असून अर्जदाराने केवळ आईवडीलांच्या सांगण्यावरुन वि.प.क्रं. १ हा सरकारी नोकरीत असल्याने जाणूनबुजून त्यास त्रास देण्याकरिता व वि.प.पासून विभक्त राहण्याकरिता अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केल्याचे कथन केले आहे. वि.प.च्या कथनाप्रमाणे अर्जदाराच्या सख्या बहिणीचा विवाह वि.प.च्या सख्या भावाबरोबर झाला असून तिची वि.पं.च्याविरुध्द कोणतीही तक्रार नाही तसेच वि.प.च्या वडीलांचा व्यवसाय अर्जदाराची बहिण व वि.प.च्या मोठ्या भावाची बायको अशा तिघी एकत्रात करत असून अर्जदारांनी सदरचा अर्ज हा मलकापूर येथील न्यायालयात दाखल करणे गरजेचे होते असे कथन केले आहे.

२. सदर नि. ३० च्या अर्जास अर्जदार यांनी आपले म्हणणे दाखल करुन विरोध केला. अर्जदारांच्या म्हणण्याप्रमाणे अर्जदार हे गेल्या १ वर्षांहून अधिक काळ माहेरी राहत असून मुलांच्या शिक्षणाकरिता अर्जदाराने कोल्हापूर येथेच भाड्याने खोली घेऊन राहत आहेत. तसेच अर्जदार हे तात्पुरत्या स्वरुपात माहेरी राहत असल्याने प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात चालण्यास पात्र असल्याचे कथन करुन वि.प. यांचा दाखल केलेला अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली.

३. प्रस्तुतचा अर्ज, त्यावरील अर्जदाराचे म्हणणे यांचे अवलोकन केले. प्रस्तुतच्या अर्जावर उभय पक्षकारांचा युक्तीवाद ऐकला. उभय पक्षकारांतर्फे दाखल करण्यात आलेली कागदपत्रे वाचली व त्यांचे अवलोकन केल्यानंतर माझ्यासमोर अवलोकनार्थ खालील मुद्दे उपस्थित झाले आहेत, त्यांची उत्तरे मी खालीलप्रमाणे नोंदवित आहेः-

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | प्रस्तुतचा अर्ज हा या न्यायालयात चालण्यास पात्र आहे काय ? | होय. |
| २. | का आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

कारणमिंमासा

मुद्दा क्रं. १ करिताः-

४. वि.प.तर्फे युक्तीवादादरम्यान विद्वान विधीज्ञांनी त्यांच्या अर्जात सादर केलेल्या

कथनांचा पुर्नच्चार करत अर्जदार हे अर्ज दाखल केल्यापासून वि.प. याच्या वडीलोपार्जित घरातील एकत्र कुटुंबात राहण्यास असून वि.प. यांना त्रास देण्याच्या हेतूने तसेच वि.प.पासून वेगळे राहण्याच्या इराद्याने व वि.प. याच्या उत्पन्नावर तिच्या आईवडीलांचा सांभाळ करण्याच्या हेतूने अर्जदारांनी ते आईवडीलांकडे राहत असल्याचे दाखवून खोटा अर्ज केल्याचे कथन केले. त्याचप्रमाणे वि.प. हा सरकारी नोकरीत असल्याने घरातील सर्व व्यवहार हे अर्जदाराच पाहत असून वि.प.ने अर्जदारांचे संगोपन, सांभाळ, शिक्षण खर्च याकडे केव्हाही दुर्लक्ष केले नसल्याचे कथन केले. वि.प.तर्फे विधीज्ञांनी आपल्या युक्तीवादामध्ये वि.प. यांनी अर्जदारांबाबतीत असणारी सर्व प्रकारची कर्तव्ये व जबाबदारीच्या हमीचे प्रतिज्ञापत्र यापुर्वीच न्यायालयात सादर केल्याचे तसेच अर्जदारास नातेवाईकांमार्फत समजावून एकत्र कुटुंबात राहण्याची विनंती करुनही अर्जदारांनी ते मलकापूर येथील वि.प. यांच्या घरात राहण्यास असतानादेखील कोल्हापूर येथे राहत असल्याचा बनाव करुन खोटा अर्ज दाखल केल्याचे नमुद केले व सरतेशेवटी अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती केली. तर अर्जदारातर्फे विद्वान विधीज्ञांनी आपल्या युक्तीवादादरम्याने वि.प. याच्या अर्जावर दिलेल्या म्हणण्यास अनुसरुन युक्तीवाद करुन अर्जदाराच्या म्हणण्यातील कथनांस दुजोरा देण्याचा प्रयत्न केला. अर्जदार तर्फे विद्वान विधीज्ञांनी अर्जदार हे मागील एक वर्षापासून कोल्हापूर येथे राहण्यास असल्याचे व वि.प. आणि त्याच्या नातेवाईकांच्या धमकीमुळे अर्जदारांनी त्यांचे संसारसाहित्य वि.प.च्या बहिणीच्या घरातून चुलत्यांच्या घरात नेल्याचा, वि.प.विरुध्द पोलीस ठाणे शाहुवाडी येथे तक्रार दिली असल्याचा तसेच कौटुंबिक हिंसाचार कायदा कलम २७(१)(अ) नुसार अर्ज दाखल करताना व त्यानंतर आजतागायत अर्जदार ही तात्पुरत्या स्वरुपात या न्यायालयाच्या स्थळसिमेत असणा-या त्यांच्या माहेरी राहत असल्याने प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात चालण्यास पात्र असल्याचा युक्तीवाद केला व सरतेशेवटी अर्जदाराने दाखल केलेला अर्ज हा चालण्यास पात्र असल्याचे कथन केले.

५. अर्जदारांनी आपल्या कथनांच्या पुष्टयर्थ त्यांनी शाहुवाडी पोलीस ठाणे येथे दाखल केलेल्या एन. सी. रिपोर्टची प्रत, अर्जदार क्रं. २ याची कागल येथील वाय.डी.माने इन्स्टीट्युट येथे भरलेल्या दि.६.२.२०१७, २६.४.२०१७ व दि. १७.११.२०१६ रोजी भरलेल्या विवीध शुल्काच्या पावत्या इ. कागदपत्रे दाखल केलेली आहेत. अर्जदारातर्फे दाखल करण्यात आलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर अर्जदाराने वि.प. याच्याविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वयेच्या अपराधाकरिता शाहुवाडी पोलीस ठाणे येथे फिर्याद दाखल केल्याचे स्पष्ट होते. सदर अदखलपात्र तक्रारीचे अवलोकन केले

असता अर्जदाराने तक्रार दाखल करताना तिचा प्रथम रहिवासी पत्ता हा ७३२ ई वार्ड, शाहुपुरी ४ थी गल्ली, करवीर, कोल्हापूर असा नमुद केल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्याचप्रमाणे अर्जदारांनी दाखल केलेल्या वाय.डी. माने इन्स्टीट्युट, कागल येथील विवीध शुल्कांच्या पावत्याचे अवलोकन केले असता अर्जदार क्रं. २ हा कागल येथील सदर इन्स्टीट्युटमध्ये शिक्षण घेत असल्याचे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे अर्जदाराने शाहुवाडी येथे दाखल केलेल्या अदखलपात्र फिर्यादीचे अवलोकन केले असता अर्जदाराने दि. २३.६.२०१७ इ. रोजी १९.०० वाजण्याच्या दरम्यान ती तिचे प्रापंचिक साहित्य नेणेसाठी मलकापूर येथील वि.प. च्या घरी गेली असता वि.प. ने अर्जदारास तिने त्याच्याविरुध्द न्यायालयात दावा दाखल करण्याच्या कारणावरुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन, शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी देऊन मुलांसह कोल्हापूरला जा अशा मजकुराची तक्रार दाखल केल्याचे प्रथमदर्शनी स्पष्टपणे दिसून येते. वि.प. याने त्याच्या अर्जामध्ये अर्जदाराने त्याच्याविरुध्द दाखल केलेल्या खटल्याबाबत कोणतीही स्पष्टोक्ती केली नसल्याचे स्पष्टपणे दिसून येते. याउलट अर्जदाराने दाखल केलेल्या प्रथम वर्दी अहवालावरुन अर्जदार ही कोल्हापूर येथील पत्यावर रहिवास करत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्याचप्रमाणे अर्जदाराने वि.प.च्या प्रस्तुत अर्जास दिलेल्या म्हणण्यामध्ये ती प्रस्तुतचे प्रकरण दाखल करत असताना व आजही कोल्हापूर येथे तात्पुरत्या स्वरुपात भाड्याने घर घेऊन राहत असल्याचे स्पष्ट केले आहे. अर्जदाराने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन अर्जदार क्रं. २ हा कागल येथील शैक्षणिक संस्थेमध्ये शिक्षण घेत असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. वि.प. याने त्यांच्या अर्जामध्ये अर्जदारांच्या तात्पुरत्या रहिवासाबाबत किंवा अर्जदार क्रं. २ हा कागल येथील शैक्षणिक संस्थेमध्ये शिकत असल्याबाबत कोणतीही स्पष्टोक्ती दिली नसल्याचे प्रथमदर्शनी स्पष्ट होते. त्याचप्रमाणे एकदा वि.प.विरुध्द खटला दाखल केल्यानंतर कोणतीही तडजोड न करताही अर्जदार पुन्हा त्याच्याजवळ त्याच्या घरी राहण्यास असल्याबाबत वि.प. याने केलेल्या कथनाबाबत साशंकता निर्माण होते. वि.प.ने आपल्या कथनांच्या पुष्ट्यर्थ सादर केलेल्या छायाचित्रांचे अवलोकन केले असता सदर छायचित्रांवरुन अर्जदार बांगड्यांचा व्यवसाय करत असल्याचे जरी दिसून येत असले तरी त्यावरुन अर्जदार ही वि.प.कडे राहण्यास असल्याचे स्पष्टपणे दिसून येत नाही.

६. वि.प.ने आपल्या कथनांच्या पुष्टयर्थ महेश चंद वि. बी. जर्नादन रेड्डी, २००२ डी.जी.एल.एस.(स.न्या.) १०६२, मिथीलेश कुमार सिंग आणि इतर वि. झारखंड सरकार आणि इतर, २००२ डी.जी.एल.एस.(झा.) ३१२, विधीज्ञ रमेश मोहनलाल भुतडा आणि इतर वि. महाराष्ट्र सरकार आणि इतर, २०११ बी.सी.आय. २०८ (मुंबई उच्च न्यायालय) आणि जागीर

कौर वि. जसवंत सिंग, १९६३ डी. जी. एल. एस. (सर्वोच्च न्यायालय) ३३ या न्यायनिर्णयांचा आधार घेतला आहे. सदर न्यायनिर्णयांच्या आधारे अर्जदाराने प्रस्तुतचे प्रकरण हे ती ज्या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये राहते त्या न्यायालयातच दाखल करणे अनिवार्य असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न केला आहे. असे असले तरी अर्जदाराच्या अर्जाचे, तिने शाहुवाडी पोलीस ठाण्यात दाखल केलेल्या प्रथम वर्दी अहवालाचे अवलोकन केले असता अर्जदाराने तिचा राहणारा पत्ता हा कोल्हापूर येथील असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्याचप्रमाणे वि.प. याने अर्जदाराने दाखल केलेल्या प्रथम वर्दी अहवालाबाबत कोणतेही अवाक्षर काढलेले दिसून येत नाही किंवा अर्जदाराचे त्यामध्ये नमुद असलेल्या पत्याबाबतही कोणताही उल्लेख केल्याचे दिसून येत नाही.

७. वि.प. यांनी प्रस्तुत अर्जास दिलेल्या म्हणण्याचे अवलोकन केले असता अर्जदार ही वि.प.विरुध्द पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यापासून त्याच्याजवळच राहत असल्याबाबत संशय निर्माण होतो. अर्जदारांच्या तसेच वि.प. याच्या कथनांचे अवलोकन केल्यास अर्जदार व वि.प. हे त्यांच्या विवाहानंतर एकत्रात एकाच घरामध्ये राहत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. त्यामुळे वि.प. यांनी अर्जदारांचा कौटुंबिक हिंसाचार केल्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे अर्जात नमुद केलेली वि.प. यांनी अर्जदारांच्या अंगावरील दागिने काढून घेऊन, त्यांना मारहाण करुन घरातून बाहेर काढण्याचा प्रयत्न केल्याची घटना ही अर्जदाराने वि.प.विरुध्द दाखल केलेल्या तक्रारीनंतर घडल्याचे व सदर तक्रार दाखल करताना अर्जदार ही कोल्हापूर येथे राहत असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण अधिनियम २००५ मधील तरतुदींनुसार अर्जदार राहत असलेल्या क्षेत्रातील कोणत्याही न्यायालयामध्ये दाद मागू शकतात. वि.प.तर्फे सादर करण्यात आलेल्या विधीज्ञ रमेश मोहनलाल भुतडा आणि इतर वि. महाराष्ट्र सरकार आणि इतर, २०११ बी.सी.आय. २०८ (मुंबई उच्च न्यायालय) या न्याननिर्णयाचे अवलोकन केले असता सदर न्यायनिर्णयामध्ये ज्यावेळी एखादे प्रकरण न्यायालयात चालण्यास पात्र आहे किंवा नाही असा मुद्दा उपस्थित केला जातो त्यावेळी नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरुन उभय पक्षकारांना त्यांचे म्हणणे शाबीत करण्यासाठी तोंडी किंवा कागदोपत्री पुरावा सादर करण्याची पुर्ण संधी देणे आवश्यक आहे. सबब प्रस्तुत प्रकरणातही अर्जदारास तिचे म्हणणे शाबीत करण्यासाठी संधी देणे आवश्यक असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. त्याचप्रमाणे अर्जदारास जरी प्रस्तुतचा अर्ज नामंजुर करुन प्रकरण चालवण्याची परवानगी दिली तरी वि.प.ला आपला पुरावा देऊन अर्जदाराचे म्हणणे खोडून काढण्याची पुर्ण संधी आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज चालण्यास पात्र असल्याच्या

निष्कर्षाप्रत मी आलो असून त्यापरिणामी मी मुद्दा क्रं. १ चे उत्तर होकारार्थी नोंदवत असून मुद्दा क्रं. २ करिता खालीलप्रमाणे आदेश पारीत करित आहे.

आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज नि. ३० नामंजुर करण्यात येत आहे.

२. उभय पक्षकारांना प्रस्तुत प्रकरण पुढे चालविण्याचे आदेश देण्यात येतात.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

सही/-

(हेमंत एस. भुरे)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, कोर्ट नं. १,
कोल्हापूर.

कोल्हापूर.
दि. १५.०७.२०१७

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Shri. S. P. Sawant |
| Name of Court | Shri. H. S. Bhure |
| Date of Dictation | 15.7.2017 |
| Judgment Signed by the P.O. on | 17.7.2017 |
| Judgment uploaded on | 18.7.2017 |